सदरक्षणाय खलनिग्रहणाय

महाराष्ट्र शासन
**पोलीस विभाग**
वार्ताहर कक्ष,
पोलीस आयुक्त, यांचे कार्यालय,
डॉ. डी. एन. रोड, मुंबई-४००००१.


दूरध्वनी क्र. २२६२०३३२
Email I.D. – pressroom.mum@mahapolice.gov.in


जा.क्र. ६०४/वार्ता.कक्ष/२०२१ दिनांक :- १८/११/२०२१

# —: प्रेस नोट :—

ना.म.जोशी मार्ग पोलीस ठाणे, मुंबई येथील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी दिनांक १३/१०/२०२१ रोजी गु.र.क्र.५८१/२०२१, कलम ३४२,३०७,३३२,३३३,५०६(२),५०४ भा.द.वि.सह ४,२५.भा.ह.का. अन्वये नोंद गुन्ह्यातील आरोपी हा हातात कोयता घेऊन दहशत माजवत असताना त्यास सपोनि वायदंडे व अंमलदार समजावित होते परंतु सदर आरोपीतांनी सपोनि वायदंडे व अंमलदार यांना सदर कोयत्याने जखमी केले. सदर वेळी स.पो.नि. वायदंडे व अंमलदार यांनी जिवाची पर्वा न करता आरोपीला पाठीमागून मिठी मारली व उपस्थित अंमलदार यांनी त्यास निशस्त्र करून ताब्यात घेतले. ना.म.जोशी मार्ग, पोलीस ठाणे मुंबई मधील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी चांगली कामगिरी करून प्रशंसनीय कामगिरी केली व जनमाणसातील मुंबई पोलीसांची प्रतिमा उंचविण्याचे सर्वोत्कृष्ट कार्य केले आहे.

यांनी केलेल्या या प्रशंसनीय व उल्लेखनीय कामगिरीबद्दल दि १६/११/२०२१ रोजी १६.३० वा मा. श्री विश्वास नांगरे पाटील, पोलीस सह आयुक्त (का व सु), बृहन्मुंबई यांनी, वाय.एम.सी.सभागृह, आग्रीपाडा, मुंबई येथे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ३ मुंबई अंतर्गत पोलीस अधिकारी व अंमलदार यांना विशेष पारितोषिक व प्रशस्तीपत्र देऊन गौरव केलेला आहे. सदर वेळी मा. श्री. ज्ञानेश्वर चव्हाण, अपर पोलीस आयुक्त, मध्य प्रादेशिक विभाग, मा.श्री.परमजीत सिंग दहिया, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, यांचे उपस्थितीत सोहळा पार पडला.

(चैतन्या एस.)
पोलीस उप आयुक्त (अभियान),
जनसंपर्क अधिकारी,
पोलीस आयुक्त कार्यालय, मंबई

Scanned with CamScanner



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner